| MHAH070011432024 | दाखल दिनांक | : | १९/१२/२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १९/१२/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०१/०१/२०२६ |
| | कालावधी | : | १ वर्षे १३ दिवस |

जिल्हा न्यायाधीश २ संगमनेर यांचे न्यायालयात,

तालुका – संगमनेर जिल्हा अहिल्यानगर.

(न्यायाधीश– मंदार नेरलेकर)

दिवाणी संकिर्ण अर्ज क्र.८८/२०२४

निशाणी क्र.२०

१. अर्णव निरज जाधव

वयः- ८ वर्षे , उद्योग-शिक्षण,

२. परिघा चंदुलाल जाधव

वयः– ५४ वर्षे, उद्योग–गृहिणी, अर्जदार

अर्जदार क्र.१ व २ रा. आदर्शनगर,

नाशिक - पुणे रस्ता, घुलेवाडी,

ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर

अर्जदार क्र.१ अ.पा.क.ची जनक आजी

अर्जदार क्र.२

पालक व पाल्य अधिनियम (Guardians and Wards Act, 1890) चे कलम ७ अन्वये संकिर्ण अर्ज.

विधीज्ञः-

अर्जदारातर्फे श्री. जे.जी.वाळुंज

–:न्यायनिर्णय:–

(दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी घोषीत)

१. अर्जदार क्र.१ नातू अर्णवची पालक म्हणून नेमणुक होवून मिळण्यासाठी अर्जदार क्र.२ ने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

अर्जातील कथने–

अर्जदार क्र.२ चा मयत मुलगा निरज चंदुलाल जाधव व दिपाली निरज जाधव यांचा अर्जदार क्र.१ मुलगा आहे. निरज जाधव दि.२४.०९.२०१८ रोजी मयत झाला. निरज जाधव मयत झाल्यानंतर अर्जदार क्र.१ ची आई दिपाली ने दुसरा विवाह केला. दिपाली दुसरे पतीचे घरी संसार करत आहे. दिपालीने अर्जदार क्र.१ चा त्याग केल्यानंतर त्याचा सांभाळ, पालनपोषण, शिक्षण व इतर सर्व बाबींची जबाबदारी अर्जदार क्र.२ आजी या नात्याने करत आलेली आहे. अर्जदार क्र.१ हा सध्या अर्जदार क्र.२ सोबत राहत आहे. अर्जदार क्र.१ यास नात्याने शैक्षणिक कामासाठी व इतर शासकीय योजनेअंतर्गत मिळणा-या रक्कमेकरीता अर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ ची हितचिंतक (प्रतिपालक) म्हणून अर्जदार क्र.२ ची पालक म्हणून नेमणुक होवून मिळावी याकरीता सदरचा अर्ज केला आहे.

२. अर्जदार क्र.१ ची आई दिपालीस नि.१५ ची नोटीस पाठविण्यात आली. सदर नोटीस बजावून परत आली. त्यावर दिपालीने "माझी काही हरकत नाही" असे लिहिले आहे.

३. अर्जदाराचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जातील कथने व युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत अर्जाचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्णवचे हित व संगोपनासाठी त्याचे पालक म्हणून नेमणुक होण्यास अर्जदार क्र.२ परिघा जाधव पात्र आहेत का ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २ | आदेश ? | अर्ज मान्य. |

## का र ण मि मां सा

मुद्दा क्र.१ करीता –

५. नि. १९ च्या यादीसोबत दाखल असलेले मुळ जन्मप्रमाणपत्र वाचले असता दिपाली व निरज जाधव यांचे मुलाची (नाव नमूद नसलेल्या) जन्मतारिख २३/०४/२०१७ दर्शविली आहे. मुळ वरुन पडताळलेले आधारकार्डची प्रत वाचली असता अर्जदार क्र.१ अर्णव ची जन्मतारिख २३/०४/२०१७ दर्शविली आहे. यावरुन अर्जदार क्र.१ अर्णव हा आज रोजी पालक व पाल्य अधिनियम कलम ४(१) चे तरतुदीला अभिप्रेत असलेला वयाने 'अज्ञान' (minor) मुलगा आहे.

६. यादी नि.३ सोबत दाखल मुळ मृत्यु प्रमाणपत्र वाचले असता निरज चंदुलाल जाधवचा मृत्यु दि.२४.०९.२०१८ रोजी झाला असे निदर्शनास येते.

७. नि.१९ च्या यादीसोबतचे मुळवरुन पडताळलेली शिधापत्रीकेची प्रत वाचली असता अर्जदार क्र.१ व २ हे गुंजाळवाडी, ता. संगमनेर या पत्यावर एकाच कुटुंबातले सदस्य आहेत असे निदर्शनास येते.

८. निरज जाधव चे मृत्युनंतर त्याची पत्नी दिपालीने दुसरा विवाह करुन ती तिच्या दुस–या पतीसोबत संसार करीत आहे या अर्जातील कथनांचे समर्थनार्थ कोणताही पुरावा सादर नाही. तथापी दिपाली यांना प्रस्तुत संकिर्ण अर्जाची नोटीस प्राप्त होऊन सुध्दा त्यांनी संकिर्ण अर्जाच्या मागणीला आक्षेप घेतलेला नाही.

९. प्रस्तुत संकिर्ण अर्जाबाबत हरकती मागविण्यासाठी सायटेशन नोटीस नि. ७ व दि.१९ जून २०२५ च्या 'आपलं महानगर' या दैनिक वृत्तपत्रातील जाहीर नोटीस नि.१० प्रसिध्द झाल्यानंतर सुध्दा प्रस्तुत संकिर्ण अर्जाला कोणीही आक्षेप घेतलेला

नाही.

१०. वय वर्षे ८ असलेल्या अर्णव चे हित, त्याचे निकोप संगोपन हा एकमेव निकष प्रस्तुत चौकशी अर्जाचे न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे.

११. बालकाचे निकोप संगोपनासाठी त्याला वात्सल्य, प्रेम व आधार मिळणे आवश्यक आहे. अर्णव चे वडीलांचे दि.२४/०९/२०१८ चे मृत्यु नंतर त्याची जनक आई दिपाली ही त्याचा सांभाळ करत नसल्यामुळे अर्णवची सर्वस्वी जबाबदारी त्याचे वडील निरजची आई अर्जदार क्र.२ परिघा यांची सद्यस्थितीत आहे असे निदर्शनास येते. अर्णव चे शारिरिक, मानसिक, बौद्धीक, शैक्षणिक निकोप प्रगतीसाठी त्याला आधार मिळणे आवश्यक आहे. तो आधार त्याला त्याची आजी (वडीलांची आई परिघा) च्या रुपाने मिळाणार आहे.

१२. अर्णव चा शारिरिक, मानसिक, भावनिक, बौद्धीक असा सर्वकष विकास होणे व त्याचे हित व कल्याण जपले जाण्याचे सर्वोच्च प्राधान्य हे निकष विचारात घेता त्याला आजी परिघा यांच्या रुपाने आधार, प्रेम व संगोपन मिळणे आवश्यक आहे. अर्णव चा सर्वंकष विकास, हित व संगोपनाचा विचार करता त्याचा ताबा पालक व पाल्य अधिनियम (Guardians and Wards Act, 1890) चे कलम ७ चे तरतुदीनुसार त्याचे आजीकडे म्हणजेच अर्जदार क्र.२ कडे देणेचा आदेश न्यायोचित ठरेल. सबब मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र.२</u>–

१३. उपरोक्त परिच्छेद क्र.०५ ते १२ मधील विश्लेषण व कारणमिमांसा व मुद्दा क्र.१ चे होकारार्थी निष्कर्षाचे पार्श्वभुमीवर अर्ज मान्य करणे आवश्यक आहे.

<u>आदेश</u>

अ. अर्ज मान्य केला आहे.

ब. पालक आणि पाल्य अधिनियम १८९० कलम ७ अन्वये अर्णव चे पालक म्हणून अर्जदार क्र.२ परिघा यांची नियुक्ती केली आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2026.01.03 11:39:05 +0530

संगमनेर
दिनांक – ०१/०१/२०२६

(मंदार नेरलेकर)
जिल्हा न्यायाधीश–२,
संगमनेर.